राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**निवडणूक तात्काळ**

क्रमांक:रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.९/का-६
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरूचौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०५/०५/२०१६

प्रति,
विभागीय आयुक्त (सर्व)

विषय :- डिसेंबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ मध्ये मुदती संपणाऱ्या नगरपरिषदा/ नगरपंचायती सार्वत्रिक निवडणुका......
सदस्य संख्या निश्चिती करणे..

संदर्भ :- १) नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने आदेश क्र. नपसु-२००१/प्र.क्र.१/ २००१/५ , दि.०१ जानेवारी, २००१.
२) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/नप-२०१४/प्र.क्र.१५/का.६, दि.२२/०५/२०१५
३) राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/मनपा-२०१३/सं.क्र.१३८/का.५ दि.११/०२/२०१४
४) राज्य निवडणूक आयोगाचे मा. मुख्यमंत्री यांना पाठविलेले अ.शा. पत्र क्र. रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.१९/का.६, दि.०४/०२/२०१६
५)राज्य निवडणूक आयोगाचे मुख्य सचिव यांना पाठविलेले अ.शा. पत्र क्र. रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.१९/का.६, दि.१९/०१/२०१६

महोदय,

आपणास माहितीच आहे की, राज्यातील १९१ नगर परिषदा व ४ नगर पंचायतींची मुदत माहे डिसेंबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ या कालावधीमध्ये संपुष्टात येत आहेत. तत्पूर्वी त्यांच्या सार्वत्रिक निवडणुका घेणे बंधनकारक आहे.

२. महाराष्ट्र नगर परिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ९ (२) नुसार संचालकांनी, नगरपरिषद व नगरपंचायत सदस्यांची संख्या निश्चित केली पाहिजे, तसेच सदस्य संख्या निश्चितीचे आदेश राजपत्रात प्रसिध्द करावयाचे आहे. संचालकांचे हे अधिकार उपरोक्त संदर्भ क्र.१ येथे नमूद दि.०१/०१/२००१ च्या आदेशाद्वारे संबंधित प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन यांनी प्रदान केलेले आहेत.

राज्य निवडणूक आयोगाचे संदर्भ क्र.२ येथे नमूद आदेशाद्वारे मुदत संपणाऱ्या नगर परिषदा/ नगर पंचायतीच्या बाबतीत सदस्य संख्या निश्चितीचे आदेश मुदत समाप्तीच्या दिनांकापूर्वी ६ महिने अगोदर काढणे आवश्यक आहे.

नगरपरिषद/नगरपंचायतीच्या निवडणुकीकरिता २०११ च्या जनगणनेची आकडेवारी वापरावयाची असून जनगणनेची आकडेवारी प्राप्त करुन घेण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे संदर्भ क्र. ३ येथील पत्राद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात आले आहे.

नगर परिषदा/ नगर पंचायतींच्या हद्दींमध्ये दि.०१/०६/२०१६ नंतर निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत बदल करण्यात येऊ नये, याबाबत आयोगाने मा. मुख्यमंत्री व मा. मुख्य सचिव यांना उपरोक्त संदर्भ क्र. ४ व ५ येथे नमूद दिनांक ०४/०२/२०१६ व १९/०१/२०१६ दिनांक च्या पत्रान्वये कळविले आहे.

३ मा. राज्य निवडणूक आयुक्त यांनी वेळोवेळी घेतलेल्या विभागीय स्तरावरील बैठकांमध्ये मुदती संपणाऱ्या नगर परिषदा/ नगरपंचायतीच्या प्रभाग रचना दि.०१ जून ,२०१६ पासून सुरु करणे आवश्यक असल्याबाबत निदेश दिले आहे.

४. उपरोक्त निदेश व सूचना ध्यानी घेता आपण मुदती संपणाऱ्या नगर परिषदा/ नगर पंचायतीच्या सदस्य संख्या निश्चितीची प्रक्रिया वेळीच पूर्ण करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु केलेली असेलच.

५. नगरपरिषदा/ नगरपंचायतीची सदस्य संख्यानिश्चित करताना खालील मुद्दे प्रामुख्याने ध्यानी घेणे आवश्यक आहे.

i) २०११ च्या जनगणना कार्यालयाकडून प्राप्त करुन घेतलेली एकूण लोकसंख्या, अनुसूचित जातीची लोकसंख्या व अनुसूचित जमातीची लोकसंख्या विचारात घ्यावी.

ii) संपूर्ण नगरपरिषदेच्या हद्दीच्या आतमध्ये लोकसंख्या सदस्यसंख्या निश्चिती करता विचारात घ्यावी, हद्दीतील कोणताही भाग वगळला जाणार नाही किंवा बाहेरील भाग समाविष्ट होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्याकरिता संबंधित मुख्याधिकारी यांच्याकडून खालीलप्रमाणे लोकसंख्येबाबतचे प्रमाण पत्र घेण्यात यावे.

प्रमाणपत्र

"मी.......... मुख्याधिकारी,....... नगरपरिषद/ नगरपंचायत जिल्हा............ असे प्रमाणित करतो की, ...... नगर परिषदेची २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या ......., अनुसूचित जातीची लोकसंख्या........ व अनुसूचित जमातीची लोकसंख्या ....... इतकी असून, ही लोकसंख्या व नकाशे मी जनगणना कार्यालयाकडून प्राप्त केले असून नगरपरिषदेची लोकसंख्या निश्चित करताना नगरपरिषद/ नगरपंचायतींच्या हद्दीमध्ये कोणताही वगळलेला नाही किंवा हद्दीबाहेरील कोणताही भाग समाविष्ट केलेला नाही याची खात्री केली आहे."

स्वाक्षरी

iii) मागील व येणाऱ्या निवडणुकीमध्ये अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीकरिता एकच पद देय असेल आणि जर ते मागील निवडणुकीमध्ये महिलेसाठी अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती महिलेकरिता राखीव असल्यास, ते पद येणाऱ्या निवणुकीकरिता या

प्रवर्गातील महिलेसाठी राखीव असणार नाही. आणि जर मागील निवडणुकीमध्ये ते पद महिलेसाठी अराखीव असल्यास ते यावेळेस थेट महिलेसाठी नेमून देण्यात यावे. (राज्य निवडणूक आयोगाचे दि. १० जुलै, २००९ च्या आदेशामधील परि.क्र.६ कृपया पहावा.)

iv) नगरपरिषद/ नगर पंचायतींच्या एकूण पदांच्या ५० टक्के पेक्षा जास्त पदे महिलांसाठी राखीव होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. (उदा. १७ पैकी ९ किंवा २५ पैकी १३ महिलांसाठी देय होतील.)

६ उपरोक्त सूचना ध्यानी घेऊन नगरपरिषद/ नगरपंचायती सदस्य संख्या दि. १६ मे, २०१६ पर्यंत निश्चित करुन राजपत्रात प्रसिध्द करावी व राजपत्राची एक प्रत तात्काळ राज्य निवडणूक आयोगास सादर करावी.

प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम लवकरच देण्यात येईल.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार.

आपला,

(ध.मा.कानेड)
उप सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :

१. जिल्हाधिकारी (सर्व)
२. मुख्याधिकारी (१९१ नगरपरिषदा व ४ नगर पंचायती)
३. निवड नस्ती

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय**
**गृहनिर्माण भवन (म्हाडा) तळमजला,**
**आदेश क्रमांक : नपसु -२००१/प्र.क्र.१/२००१/५**
**वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१**
**दिनांक : १ जानेवारी २००१.**

<u>वाचा</u> १) नगर विकास विभाग, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभाग, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्रमांक एमयुजी-५४७५/२११४/युडी-१०(सी) दिनांक ४.६.१९७६.

२) संचालक, नगरपरिषद प्रशासन, मुंबई यांचेकडील आदेश क्र. डीएमई - १०७६/II, दि. ४.६.१९७६.

३) नगर विकास विभाग व सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना क्रमांक - डीएमए-१०७७/९४५/सीआर-१९५/युडी-९, दिनांक २२.९.१९७७

४) नगर विकास विभाग, अधिसूचना क्रमांक - एमसीओ-२२८४/१११८ / सी-आर-२५१/८४/युडी-१४, दिनांक ६ फेब्रुवारी १९८५.

५) नगर विकास विभाग पत्र क्रमांक एमसीओ-२२८५/३२५/सीआर-४४/नवि-१४, दि.२२.२.१९८५.

६) संचालक, नगरपरिषद प्रशासन, मुंबई यांचेकडील आदेश क्र. डीएमई - १०९१/सीआर-५३, दि.२०.७.१९९१

७) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र. एमसीओ-२२९७/५१६/सीआी-५३/९/युडी-१४, दि. ६.६.१९९२

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील तरतुदीप्रमाणे नगरपरिषदांच्या कामकाजावर क्षेत्रीय पातळीवर म्हणजेच प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन आणि जिल्हाधिकारी यांचे पातळीवर प्रभावी नियंत्रण असणे आवश्यक आहे. या संदर्भात यापूर्वी संचालालयाकडून वेळोवेळी अधिकारांचे विकेंद्रीकरण करुन आदेश काढण्यात आले होते परंतु असे दिसून आले आहे की, प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन आणि जिल्हाधिकारी या पातळीवर यापूर्वी त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराच्या वापराबद्दल काही प्रमाणात संदिग्धता आहे. ही संदिग्धता दूर करणे जरुरीचे आहे. त्या शिवाय क्षेत्रीय पातळीवर अधिकारांचे अधिक प्रमाणात विकेंद्रीकरण होवून वापर करणे जरुरीचे आहे असे संचालालयाचे मत आहे.

प्रशासन गतीमान करता यावे याकरीता अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्याचे शासनाचे धोरण आहे. हे ध्यानात ठेवून नगरपरिषद प्रशासन संचालनालयास प्राप्त अधिकारांचे विकेंद्रीकरण व्हावे याकरीता खालील आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे (यापुढे सुलभ संदर्भासाठी "अधिनियम" असा उल्लेख) कलम ७४ चे पोटकलम २ व ३ चा परंतुक अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन तसेच या संचालनालयातील आधीच्या सर्व आदेशांचे अधिक्रमण करुन संचालक, नगरपरिषद प्रशासन, मुंबई हे त्यांना अधिनियमन अंतर्गत असलेले व शासनाने त्यांना वेळोवेळी प्रदान केलेले "परिशिष्ट-१" मधील अधिकार स्वत:कडे राखून ठेवत आहेत.

०२. पुढे असे ही स्पष्ट करण्यात येत आहे की, वरील परिशिष्ट-१ मधील अधिकार वगळता नमूद कलम ७४ चे पोटकलम ३ अन्वये संचालकांना असलेले व शासनाने त्यांना वेळोवेळी प्रदान केलेले परिशिष्ट-२ मध्ये नमूद केलेल्या अधिकाराचा वापर करण्यास संबंधीत प्रादेशिक संचालक नगरपरिषद प्रशासन हे सक्षम आहेत. त्याप्रमाणे प्रादेशिक संचालकांनी या अधिकारांचा वापर करावा.

०३. संचालक, नगरपरिषद प्रशासन हे त्यांना अधिनियमातील प्राप्त अधिकार/शक्ती परिशिष्ट ३ व परिशिष्ट ४ मध्ये नमूद केल्यानुसार अनुक्रमे प्रादेशिक संचालक व जिल्हाधिकारी यांना प्रदान करीत आहेत.

०४. या आदेशान्वये प्रदान करण्यात आलेले अधिकार व शक्ती तसेच संचालकाबरोबरच प्रादेशिक संचालक, - नगरपरिषद प्रशासन वापरण्यास सक्षम असलेले अधिकार यांचा सर्व प्रादेशिक संचालक नगरपरिषद प्रशासन व सर्व जिल्हाधिकारी यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील नगरपरिषदांच्या कामकाजावर पर्यवेक्षण वाढविण्याकरिता आणि नियंत्रण प्रभावी करण्याकरिता पुरेपूर वापर करावा ही विनंती.

०५. हे आदेश ०१.०१.२००१ पासून अंमलात येतील.

(भगवान सहाय)
संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति,

१) विभागीय आयुक्त व प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन (सर्व)
२) जिल्हाधिकारी (सर्व) (मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून)
३) अध्यक्ष, नगरपरिषदा (सर्व)
४) मुख्याधिकारी, नगरपरिषदा (सर्व)
५) मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
६) उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोंकण/नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती व नागपूर.

**प्रत माहितीसाठी**

१) मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२) मा. मुख्यमंत्र्यांचे सह सचिव, मुख्यमंत्र्यांचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
३) मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
४) नगर विकास विभाग, (नवि-१४) मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
५) कार्यासन अधिकारी, (सर्व) नगरपरिषद प्रशासन संचालनालय.
६) निवड नस्ती.

## प्रादेशिक संचालकांना प्रदान केलेले अधिनियमातील तरतुदीनुसार संचालकांना असलेले मूळ अधिकार
## (संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई याचे
## आदेश क्र नपसु-२००१/प्र.क्र.१/२००१/५, दिनांक ०१. १.२००१ अन्वये)

### परिशिष्ट - ३

| अधिनियमातील कलम | विषय |
|---|---|
| ९(२) | आरक्षणासह नगरपरिषदेच्या सदस्यांची संख्या निश्चित करणे. |
| ७१ | कलम ७० अन्वये विषय सा मतीच्या विषय वाटपाच्या उपविधींना मान्यता देणे. |
| ७१(अ) | स्थायी समिती या विषय समितीचे अधिकार व कर्तव्ये आम सभा किंवा विशेष विषय समतीद्वारे पार पाडण्याच्या प्रस्तावास मान्यता देणे. |
| ७५(अ) | (अ)श्रेणी-३ मुख्याधिकाऱ्यांची विभागा अंतर्गत बदली.<br>(ब) श्रेणी-३ मुख्याधिकारी यांच्यावर किरकोळ शिक्षा ठोठावणे.<br>(क)श्रेणी-३ मुख्याधिकारी यांच्यावर किरकोळ शिक्षा ठोठावणे. |
| ७९(६) | कर्मचाऱ्यांना नगरपरिषदेने दिलेल्या शिक्षेविरुद्धचे अपिलाची सुनावणी व निर्णय. |
| ९७(अ) आणि (ब) (१) (२) | नगरपरिषदेच्या हद्दीबाहेर निधी खर्च करण्यास मान्यता देणे. |
| ३०१(एफ)(दोन) | कलम १७३ पोटकलम ३ अन्वये विक्री करण्यात आलेल्या किंवा भाडेपट्ट्याने दिलेल्या स्थावर मालमत्तेसंबंधीच्या दाव्याच्या समेटास मान्यता देणे. |
| ३०८(४) | जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश बदलणे, रद्द करणे इत्यादी. |
| ३२३(३)(४) | उपविधी स्वीकारण्यास भाग पाडणे. |
| ३४१क्यू (३) अणि (४) | आद्योगिक नगरांचा ठराव रद्द करण्यासंबंधीचा जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश रद्द करुन निरसीत करणे. |

(भगवान सहाय)
संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

नगरपरिषदा / नगरपंचायती यांची
सदस्य संख्या निश्चित करण्याबाबत

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक -रानिआ/नप-२०१४/प्र.क्र. १५/का-६,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २२/०५/२०१५.

## आदेश

ज्याअर्थी,-

(i) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करणे व या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण करणे याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे, व

(ii) संविधानाच्या अनुच्छेद २४३ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ४१(अ) नुसार नगरपरिषदांची मुदत संपण्यापूर्वी त्यांची निवडणूक घेणे बंधनकारक आहे, व

(iii) नवीन नगरपरिषदा जाहीर करणे, नगरपरिषद क्षेत्रामध्ये बदल करण्याचे अधिकार शासनाचे असून या अधिकारानुसार नवीन नगरपरिषदा स्थापन करणे, त्यांच्या क्षेत्रात बदल करणे इत्यादिबाबतचे आदेश वेळोवेळी शासनामार्फत काढण्यात येतात.

आणि ज्याअर्थी, --

(i) संबंधित नगरपरिषदेच्या क्षेत्रामध्ये मुदत समाप्तीपूर्वी ६ महिने आधी बदल करण्यात येऊ नयेत असे राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.४/का.५, दि.२७/०१/२००५ आहेत, व

(ii) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ९(२) नुसार सदस्य संख्या निश्चितीचे अधिकार संचालक, नगरपालिका प्रशासन यांना असून सदर अधिकार नगरपालिका प्रशासन यांचे आदेश क्र.नपसं-२००१/प्र.क्र.१/२००१/५, दि.०१/०१/२००१ अन्वये प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन यांना प्रदान केलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, -

नियमात वरील तरतुदी असताना देखील सदस्य संख्या निश्चितीबाबतचे आदेश संचालक, नगरपालिका प्रशासन / प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन यांचेकडून अनेकदा वेळीच काढण्यात येत नसल्याने, नगरपरिषदांच्या निवडणुका विहित मुदतीत घेण्याच्या कामामध्ये अडचणी निर्माण होतात किंवा नव्याने स्थापन झालेल्या किंवा क्षेत्रबदल झालेल्या नगरपरिषदांच्या निवडणुका ६ महिने पूर्ण होण्याच्या कालावधीत घेणे शक्य होत नाही.

त्याअर्थी, -

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए तसेच महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०ए(४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने पारित केलेले आदेश लक्षात घेता नगरपरिषदा / नगरपंचायतींची सदस्य

संख्या वेळीच निश्चित करण्यासाठी राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

i) **मुदती संपणाऱ्या नगरपरिषदा / नगरपंचायतींची सदस्य संख्या निश्चित करणे**

अ) प्रादेशिक संचालक, नगपालिका प्रशासन यांनी त्यांच्या अखत्यारित येणाऱ्या ज्या नगरपरिषदा / नगरपंचायती यांच्या मुदती संपुष्टात येत आहेत त्याचा आढावा घेऊन सदस्य संख्या निश्चितीसंबंधीची कार्यवाही पूर्ण करुन सदस्य संख्या निश्चितीचे आदेश मुदत समाप्तीच्या दिनांकापूर्वी ६ महिने अगोदर राजपत्रात प्रसिध्द करावेत.

ब) सदस्य संख्या निश्चितीच्या राजपत्राची प्रत प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आंत राज्य निवडणूक आयोगास सादर करावी.

ii) **नव्याने स्थापन झालेल्या नगरपरिषदा / नगरपंचायतींची सदस्य संख्या निश्चित करणे :-**

नव्याने स्थापन झालेल्या नगरपरिषदा / नगरपंचायतींच्या सदस्य संख्या निश्चितीचे आदेश राजपत्रात प्रसिध्द करून त्याची प्रत नगर परिषद/नगर पंचायत स्थापन झाल्याच्या आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आंत राज्य निवडणूक आयोगास सादर करावी.

iii) **हद्दवाढ झालेल्या नगरपरिषद / नगरपंचायतींची सदस्य संख्या निश्चित करणे**

अ) ज्या नगरपरिषद / नगरपंचायत यांची हद्दवाढ झाली आहे त्यांचेबाबतीत, सदस्य संख्या निश्चित करुन सदस्य संख्या निश्चितीच्या आदेशाच्या राजपत्राची प्रत हद्दवाढीच्या अधिसूचनेपासून १५ दिवसांचे आत राज्य निवडणूक आयोगास सादर करावी.

ब) नगरपरिषद / नगरपंचायत क्षेत्रवाढ झालेल्या भागाकरिता सदस्य संख्या देय होत नसेल तर तसे हद्दवाढ झाल्याच्या आदेशांच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत तसे राज्य निवडणूक आयोगास कळवावे.

iv) वरील आदेशाच्या अनुषंगाने नगरपालिका प्रशासन यांनी संबंधित प्रादेशिक संचालक यांचा दर तीन महिन्यांनी आढावा घ्यावा आणि त्याचा एकत्रित अहवाल राज्य निवडणूक आयोगास न चुकता सादर करावा.

(v) सदस्य संख्या निश्चितीचे आदेश

अ) मुदत संपणाऱ्या नगरपरिषदा / नगरपंचायतींच्या बाबतीत मुदत समाप्तीच्या दिनांकापूर्वी ६ महिने अगोदर आणि

ब) नव्याने स्थापन झालेल्या किंवा क्षेत्र बदल झालेल्या नगरपरिषदा / नगरपंचायतींच्या बाबतीत स्थापनेचे आदेश किंवा क्षेत्र बदलाचे आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसात राज्य निवडणूक आयोगास प्राप्त न झाल्यास संचालक, नगरपालिका प्रशासन यांना जबाबदार धरण्यात येईल.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला

धमाकानेड

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रत :-

प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
जिल्हाधिकारी, (सर्व)
संचालक, नगरपालिका प्रशासन, वरळी
प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन,
मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपंचायती (सर्व)

-----

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०१३/सं.क्र.१३८/का.०५
नवीन प्रशासन भवन,मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई ४०० ०३२
दिनांक- ११.०२.२०१४

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त.
सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत.

विषय :- सन २०११ च्या जनगणनेनुसार प्रगणक गटनिहाय लोकसंख्या आणि नकाशे घेऊन त्यावर एकत्रित नकाशा तयार करण्याबाबत...

महोदय,

जनगणना कार्यालयाकडून सन २०११ च्या जनगणनेनुसार प्रगणक गटनिहाय लोकसंख्येची आकडेवारी असलेली सीडी विहित रक्कम भरुन उपलब्ध आहे. तसेच प्रगणक गटाचे नकाशे प्रति नकाशा रु. ५०/- याप्रमाणे सीडी स्वरुपात उपलब्ध आहेत. तरी जनगणना कार्यालयाशी संपर्क साधून आपल्या महानगरपालिकेची / नगरपरिषद / नगरपंचायतीची प्रगणक गटनिहाय लोकसंख्येची आकडेवारी व प्रगणक गटाचे नकाशे दि. १५ एप्रिल, २०१४ पर्यंत प्राप्त करुन घ्यावेत. याकरिता जनगणना कार्यालयाचा पत्ता व इतर तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

संचालक,
जनगणना कार्यालय, एक्सचेंज बिल्डींग,
२ रा मजला, सर शिवसागर रामगुलाम मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई ४००००१.
फोन नं ०२२-२२६१५४९४ टेलीफॅक्स नं -०२२ २२६९१२६६
ई-मेल - dco-mah.rgi@censusindia.gov.in

सदर नकाशे प्राप्त झाल्यानंतर त्या नकाशांवरुन महानगरपालिका / नगरपरिषद / नगरपंचायत यांच्या नकाशावर प्रगणक गटांची मांडणी करुन सर्व प्रगणक गट दर्शविलेला एकत्रित नकाशा दि. १ जून, २०१४ पर्यंत तयार करण्यात यावा व तसे केल्याबाबत राज्य निवडणूक आयोगास कळविण्यात यावे.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

आपला,
(स्वाक्षरी)
( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र



D:\Corpn 2014-15\Elec 2014-15.doc

डॉ. प्रदीप व्यास, भा.प्र.से.
सचिव

सत्यमेव जयते

अ.शा.प.क्रमांक : रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.१९/का-६,

**राज्य निवडणूक आयोग**
**महाराष्ट्र**

दिनांक : १९ जानेवारी, २०१६.

विषय:- <u>स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मार्च, २०१७ पूर्वीच्या सार्वत्रिक निवडणुका</u> निर्भय, मुक्त व पारदर्शक करण्यासाठी पूर्वतयारी...

आदरणीय महोदय,

आपल्याला माहीतच आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लोकसभा/विधानसभांप्रमाणे निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात व्हाव्यात यासाठी भारतीय संविधानामध्ये १९९२ मध्ये दुरुस्ती करण्यात आली असून, प्रत्येक राज्यामध्ये एक स्वतंत्र राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या निकालानुसार (प्रामुख्याने सिव्हिल अपिल क्रमांक- ५७५६/२००५, श्री. किशनसिंग तोमर विरुध्द अहमदाबाद महानगरपालिका व इतर) राज्य निवडणूक आयोगाने दिलेले आदेश व सूचनांची अंमलबजावणी करणे राज्य शासनावर बंधनकारक आहे.

२.१ राज्यामध्ये पुढे दर्शविल्याप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मुदती डिसेंबर-२०१६ ते मार्च, २०१७ पर्यंत संपत असल्याने त्यापूर्वी त्यांच्या सार्वत्रिक निवडणुका होणे आवश्यक आहे :-

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्थेचे नांव | मुदत कधी संपत आहे? | एकूण संख्या | एकूण सदस्यसंख्या अंदाजे | मुदत संपण्यापूर्वी सहा महिने आधी सुरुवात |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १. | नगर परिषद/नगर पंचायती | डिसेंबर-२०१६ ते फेब्रुवारी-२०१७ | १९५ | ४४६५ | १/६/२०१६ |
| २. | महानगरपालिका | मार्च-२०१७ | १० | १२४४ | १/९/२०१६ |
| ३. | जिल्हा परिषदा | मार्च-२०१७ | २६ | १५७५ | १/९/२०१६ |
| ४. | पंचायत समित्या | मार्च-२०१७ | २९६ | ३९२० | १/९/२०१६ |

पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२, दूरध्वनी : (कार्यालय) ०२२-२२८४ ५९ ०० / २२८४ ५१ १४
फॅक्स क्र. : ०२२-२२८४ [illegible] statelectioncommission@gmail.com वेबसाईट : www.mahasec.com

२.२ या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणेच निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात व्हाव्यात याकरिता राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी अनेक आदेश निर्गमित केले आहेत. त्यापैकी काही खालीलप्रमाणे आहेत:-

(i) महानगरपालिकांच्या निवडणुकांची संपूर्ण जबाबदारी महानगरपालिका आयुक्त व जिल्हा परिषद/पंचायत समिती, नगर परिषद/नगर पंचायती व ग्रामपंचायती यांच्या निवडणुकांची संपूर्ण जबाबदारी जिल्हाधिकारी यांची आहे.

(ii) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे तीन मुख्य टप्पे (प्रभाग रचना, विधानसभा मतदार यादीचे विभाजन व प्रत्यक्ष मतदानाची प्रक्रिया) असल्याने त्यांची मुदत संपण्यास सहा महिन्यांपेक्षा कमी कालावधी शिल्लक असताना त्यांच्या क्षेत्र व हद्दीमध्ये कोणताही बदल करण्यात येऊ नये.

(iii) आदर्श आचारसंहितेची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. निर्भय, मुक्त व पारदर्शक निवडणुकांमध्ये व्यत्यय येईल असे कोणतेही कृत्य करु नये.

(iv) उमेदवार, राजकीय पक्ष इ. यांना निवडणूक प्रक्रिया आणखी पारदर्शक व सोयीची व्हावी म्हणून प्रभाग रचना, मतदार यादीचे विभाजन, नामनिर्देशनपत्र व घोषणा संगणकामार्फत करण्यात यावेत.

३. वरील तक्त्याच्या रकाना-६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे नगर परिषदा/नगर पंचायतींकरिता दि.०१/०६/२०१६ व जिल्हा परिषदा/पंचायत समित्या व महानगरपालिकांकरिता दि. ०१/०९/२०१६ पासून प्रभाग रचना, मतदार यादी विभाजन इ.ची प्रक्रिया सुरु करणे आवश्यक असल्याने राज्य निवडणूक आयोगाने त्यांच्या पूर्वतयारीस सुरुवात केली आहे.

वरील बाबी लक्षात घेता मी आपल्याला विनंती करू इच्छितो की, शासनाच्या संबंधित विभागांनीसुध्दा या निवडणुकांच्या सर्व पूर्वतयारीची सुरुवात आतापासूनच करावी. यामध्ये पुढील बाबींचा प्रामुख्याने समावेश असेल :-

(i) **स्थानिक स्वराज्य संस्थांचे क्षेत्र व हद्दीमध्ये बदल न करणे-** नगरपरिषदा / नगरपंचायतींच्या हद्दीमध्ये दि. ०१/०६/२०१६नंतर व जिल्हा परिषद/पंचायत समिती तसेच महानगरपालिकांच्या हद्दीमध्ये दि.०१/०९/२०१६ नंतर निवडणूक प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत बदल करण्यात येऊ नये. हद्दीमध्ये बदल करावयाचा असल्यास त्यासंदर्भातील अंतिम अधिसूचना नगरपरिषद/नगरपंचायतींच्या बाबतीत दि.०१/०६/२०१६ पूर्वी व जिल्हा परिषद/पंचायत समिती, महानगरपालिकांच्या बाबतीत दि. ०१/०९/२०१६ पूर्वी निर्गमित केली जाईल याची दक्षता घेण्यात यावी.

(ii) **निवडणूक खर्चासाठी आर्थिक तरतूद उपलब्ध करून देण्याबाबत-** जिल्हा परिषदा/पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये होणारा खर्च करण्याची सर्व जबाबदारी राज्य शासनाची आहे. राज्य शासनाने निश्चित केलेले निकष (रुपये ३०-३५/- प्रति मतदार) हे अत्यंत अपुरे आहेत. यामध्ये लोकसभा/विधानसभा निवडणुकीप्रमाणे (रुपये ८० ते १००/- प्रति मतदार) अशी सुधारणा करण्यात यावी. ग्रामविकास व जलसंधारण विभागाने या विषयीचा प्रस्ताव तयार केल्याचे समजते. तरी त्यास त्वरीत मान्यता देण्यात यावी.

नगर परिषदा/नगर पंचायतींच्या निवडणुकांचा खर्च करण्याची जबाबदारी जरी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांची असली तरीही काही नगर परिषदा/नगर पंचायती यांची आर्थिक स्थिती अत्यंत कमकुवत असल्याचे समजते. म्हणून शासनाने या सर्व नगर परिषदा व नगर पंचायतींच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेऊन ज्यांची आर्थिक स्थिती कमकुवत आहे त्यांना योग्य तो निधी उपलब्ध करून द्यावा. निधीची कमतरता जर मुक्त,



अ ब क = एकूण
१८ ७३ १२५ = २१६

निर्भय व पारदर्शक निवडणुकांमध्ये व्यत्यय आणणारी असेल तर राज्य निवडणूक आयोगास संविधानातील तरतुदीनुसार योग्य ते आदेश राज्य शासनास द्यावे लागतील.

(iii) **अधिकारी/कर्मचारी यांच्या बदली/पदस्थापनेबाबत**- शासनाने निवडणुकांशी निगडित सर्व अधिकारी उदा. महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधिक्षक, मुख्याधिकारी, तहसिलदार, इत्यादी हयांचा आढावा घेऊन आयोगाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांप्रमाणे त्यांची बदली / पदस्थापनेबाबत कार्यवाही करावी. उदा.

(अ) दिनांक १ जून, २०१६ रोजी ज्या अधिकाऱ्यांना सध्याच्या पदावर तीन वर्षे पूर्ण होत असतील त्यांची बदली करण्यात यावी.

(ब) याव्यतिरिक्त स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे कार्यक्रम माहे नोव्हेंबर, २०१६ ते फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत सुरु राहणार असल्याने या कालावधीत ज्या अधिकाऱ्यांना सध्याच्या पदावर तीन वर्ष पूर्ण होणार असतील अशा अधिकाऱ्यांच्याही बदल्या करण्यात याव्यात.

(क) ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक असेल त्या ठिकाणचे स्थानिक रहिवाशी अधिकारी असू नयेत.

(ड) कर्तव्यदक्ष, निष्पक्ष असणारे अधिकारी नियुक्त करावेत, जेणेकरून कोणत्याही तक्रारी उद्भवणार नाहीत.

(iv) **संगणकीकरण** -राज्य निवडणूक आयोग निवडणूक प्रक्रियेकरिता माहिती व तंत्रज्ञान विभाग आणि महाऑनलाईनबरोबर गेल्या एक वर्षापासून काम करीत आहे. माहिती व तंत्रज्ञान विभाग आणि महाऑनलाईन यांनी क्षेत्रीय स्तरावर त्याची चाचणी करुन सर्व सॉफ्टवेअर व सिस्टीम बिनचूक तयार करून राज्य निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या

कॅलेंडरप्रमाणे अंमलबजावणी करावी. कोणत्याही कारणामुळे यात विलंब किंवा कुचराई होता कामा नये.

(v) **आचारसंहिता** – उपरोक्त निवडणुकांमुळे माहे नोव्हेंबर-२०१६ ते फेब्रुवारी-२०१७ पर्यंत असे जवळ-जवळ ४ महिने संपूर्ण राज्यात आचारसंहिता लागू रहाणार आहे. त्यामुळे या कालावधीत मतदारांवर प्रभाव पडेल असे कोणतेही निर्णय घेता येणार नाहीत. तसेच राज्य निवडणूक आयोगाच्या आचारसंहितेबाबतच्या दिनांक २९ डिसेंबर, २०११ च्या आदेशामधील तरतुदींचे पालन करणे सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील.

५. वरील विषयांवर राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनांप्रमाणे सर्व संबंधित विभागांनी (उदा. नगर विकास विभाग, ग्रामविकास विभाग, महसूल विभाग, वित्त विभाग, गृह विभाग, माहिती व तंत्रज्ञान, इत्यादी.) तातडीने कार्यवाही करण्याबाबत आपण कृपया आदेशित करावे.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला

20/11/2016

( डॉ. प्रदीप व्यास )

का प्र.

श्री. स्वाधीन क्षत्रिय, भा.प्र.से.,
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.

20/11/16

मुंबई ४०००३२.

निर्गमित
२०/११/१६

F:\राज्य निवडणूक आयुक्तांनी डिक्टेट केलेली पत्र\नप- जिपपंस- मनपा निवडणूक-२०१६-१७.docx

का.- ५
का - ६
21/11/16
का - ६ — 21/11/2016
सि.स. मा. सचिव -
सि. स. मा. आयुक्त

अ ब क = ३५०
१८ ७३ १२५ = २१६

जगेश्वर स. सहारिया
राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र

अ.शा.प.क्रमांक-रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.१९/का.
राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

दिनांक : ४ फेब्रुवारी २०१६.

निवडणूक प्राथम्य

विषय:- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मार्च, २०१७ पूर्वी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पूर्वतयारीबाबत...

आदरणीय महोदय,

आपल्याला माहीतच आहे की, राज्यामध्ये मार्च-२०१७ पूर्वी मोठ्या प्रमाणावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मुदती संपत असल्याने त्यापूर्वी त्यांच्या सार्वत्रिक निवडणुका होणे आवश्यक आहे. (परिशिष्ट) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ३ मुख्य टप्पे असतात:-

i) प्रभाग रचना

ii) राज्य निवडणूक आयोगाने जाहिर केलेल्या "विशिष्ट दिनांकास" अस्तित्वात असलेली विधानसभा मतदार याद्यांचे प्रभागनिहाय विभाजन करणे व

iii) प्रत्यक्ष निवडणूक (नामनिर्देशनपत्र दाखल करण्यापासून ते मतमोजणी पर्यंत)

ह्या तीनही टप्प्यांच्या कामाची व्याप्ती लक्षात घेता प्रभाग रचना करण्याबाबतची कार्यवाही त्यांची मुदत संपण्यापूर्वी सहा महिने आगोदर सुरू करावी लागते.

२. परिशिष्टामध्ये दर्शविल्याप्रमाणे सुमारे दि.०१/०६/२०१६ व दि. ०१/०९/२०१६ पासून प्रभाग रचनेची प्रक्रिया सुरु करणे आवश्यक असल्याने राज्य निवडणूक आयोगाने त्याच्या पूर्वतयारीस सुरुवात केली आहे.

३. वरील बाबी लक्षात घेता मी आपल्याला विनंती करू इच्छितो की, शासनाच्या संबंधित विभागांनीसुध्दा पूर्वतयारीची सुरुवात आतापासूनच करावी. यामध्ये पुढील बाबींचा प्रामुख्याने समावेश असेल :-

पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दूरध्वनी : (कार्यालय) ०२२-२२०२ ३४ ३७ / २२०२ ६३ २९ फॅक्स क्र. : ०२२-२२८४ ६७ २१

(i) <u>स्थानिक स्वराज्य संस्थांचे क्षेत्र व हद्दीमध्ये बदल न करणे-</u>

नगर परिषदा / नगर पंचायतींच्या हद्दीमध्ये सुमारे दि. ०१/०६/२०१६ नंतर व जि परिषद/पंचायत समिती / महानगरपालिकांच्या हद्दीमध्ये सुमारे दि.०१/०९/२०१६ न निवडणूक प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत बदल करण्यात येऊ नये. हद्दीमध्ये बदल करावयाचा असल्य तो तत्पूर्वी करण्यात यावा. (राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/न २००५/प्र.क्र.५/का-५, दि. २७/०१/२००५)

(ii) <u>निवडणूक खर्चासाठी आर्थिक तरतूद उपलब्ध करून देण्याबाबत-</u>

अ) जिल्हा परिषदा/पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये होणारा खर्च करण्याची सर्व जबाबद राज्य शासनाची आहे. राज्य शासनाने निश्चित केलेले निकष (रुपये ३०-३५/- प्रती मतद हे अत्यंत अपुरे आहेत. यामध्ये लोकसभा/विधानसभा निवडणुकीप्रमाणे (रुपये ८० ते १०० प्रती मतदार) अशी सुधारणा करण्यात यावी. ग्रामविकास व जलसंधारण विभागाने विषयीचा प्रस्ताव तयार केल्याचे समजते. तरी त्यास त्वरीत मान्यता देण्यात यावी. (रा निवडणूक आयोगाचे अ.शा.प.क्र.रानिआ/ग्रापंनि-२०१४/प्र.क्र.१५/का- दि.३०/०५/२०१५)

ब) नगर परिषदा/नगर पंचायतींच्या निवडणुकांचा खर्च करण्याची जबाबदारी जरी संबंधि स्थानिक स्वराज्य संस्थांची असली तरीही काही नगर परिषदा/नगर पंचायती यांची आर्थि स्थिती अत्यंत कमकुवत असल्याचे समजते. म्हणून शासनाने या सर्व नगर परिषदा व नग पंचायतींच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेऊन ज्यांची आर्थिक स्थिती कमकुवत आहे त्यांन योग्य तो निधी उपलब्ध करून द्यावा.

(क) निधीची कमतरता जर मुक्त, निर्भय व पारदर्शक निवडणुकांमध्ये व्यत्यय आणणारी असेल तर संविधानातील तरतुदीनुसार राज्य निवडणूक आयोगास योग्य ते आदेश द्यावे लागतील.

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.१२/का-६,दि.१४/०८/२०१५व अ.शा.प.क्र.रानिआ/नप-१५/प्र.क्र.९/का-६, दि.२७/१०/२०१५)

(iii) अधिकारी/कर्मचारी यांच्या बदली/पदस्थापनेबाबत-

निवडणुकांशी निगडित सर्व अधिकारी (उदा. महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधिक्षक, मुख्याधिकारी, तहसिलदार, इत्यादी) यांचा आढावा घेऊन राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांप्रमाणे शासनाने त्यांची बदली/ पदस्थापनेबाबत कार्यवाही करावी. उदा.

(अ) मार्च, २०१७ पर्यंत या सध्याच्या पदावर तीन वर्ष पूर्ण होणार असतील अशा अधिकाऱ्यांची बदली प्रभाग रचना सुरु होण्यापूर्वी करण्यात यावी.

(ब) ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक असेल त्या ठिकाणचे स्थानिक रहिवाशी अधिकारी असू नयेत.

(क) निवडणुकीशी निगडित सर्व अधिकारी/कर्मचारी हयांचे वर शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाकडे असल्याने कर्तव्यदक्ष, निष्पक्ष अधिकारी नियुक्त करावेत, जेणेकरून कोणत्याही तक्रारी उद्भवणार नाहीत. (राज्य निवडणूक आयोगाचे परिपत्रक क्र. रानिआ-२००६/प्र.क्र.१४/का-५,दि.०२/०८/२००६)

(iv) संगणकीकरण -

काही महिन्यापासून सुरू असलेली संगणक आज्ञावली (Software) तयार करण्याची प्रक्रिया कांही कारण नसताना माहिती तंत्रज्ञान विभाग आणि महाऑनलाईन (Mahaonline) यांनी डिसेंबर २०१५ पासून थांबविली असल्यामुळे या निवडणुकांच्या कामामध्ये खिळ बसण्याची शक्यता आहे. म्हणून माहिती तंत्रज्ञान विभाग आणि महाऑनलाईन (Mahaonline) यांनी संगणक आज्ञावली बिनचूक तयार करून राज्य निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या कालमर्यादेप्रमाणे अंमलबजावणी करावी.

(v) आचारसंहिता -

उपरोक्त निवडणुकांकरीता माहे नोव्हेंबर-२०१६ ते फेब्रुवारी-२०१७ पर्यंत असे जवळ-जवळ ४ महिने संपूर्ण राज्यात आचारसंहिता लागू राहण्याची शक्यता असल्याने, विकासाची कामे सुरळीत सुरू रहातील व त्यांचे वर विपरित परिणाम होणार नाही याची खबरदारी सर्व प्रशासकीय विभागांनी आतापासूनच घ्यावी.

४. वरील सूचनांप्रमाणे सर्व संबंधित विभाग (उदा. नगर विकास, ग्रामविकास व जलसंधारण, महसूल व वन, वित्त, गृह, माहिती व तंत्रज्ञान इत्यादी) यांनी तातडीने कार्यवाही करण्याबाबत आपण कृपया आदेशित करावे, ही विनंती.

आपला
सही/-
( ज. स. सहारिया )

मा. श्री. देवेंद्र फडणवीस,
मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित.

१) अपर मुख्य सचिव. गृह विभाग, मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.
२) अपर मुख्य सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.
३) प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.
४) प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.
५) प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.
६) प्रधान सचिव(१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.
७) सचिव(२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.

( ध. मा. कानेड )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग

# परिशिष्ट

## मार्च-२०१७ पूर्वी सार्वत्रिक निवडणुका होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांची संख्या

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | जिल्हे | |
|---|---|---|---|
| (i) | महानगरपालिका- १० | बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे पिंपरी-चिंचवड, सोलापूर, नाशिक अकोला, अमरावती नागपूर | |
| (ii) | जिल्हा परिषदा- २६ | सर्व (ठाणे, पालघर, धुळे, नंदूरबार, अकोला, वाशिम, भंडारा, गोंदिया या ८ जिल्हा परिषदा वगळून) | |
| (iii) | पंचायत समित्या- २९६ | सर्व (ठाणे, पालघर, धुळे, नंदूरबार, अकोला, वाशिम, भंडारा, गोंदिया या ८ जिल्हा परिषदांतर्गत पंचायत समित्या वगळून) | |
| (iv) | नगर परिषदा / नगर पंचायती- १९५ | महसूल विभागाचे नाव | नगर परिषदा / नगर पंचायतींची संख्या |
| | | कोकण | १८ |
| | | नाशिक | ४० |
| | | पुणे | २९ |
| | | औरंगाबाद | ४८ |
| | | अमरावती | ३४ |
| | | नागपूर | २६ |
| | | एकूण | १९५ |